**महाराष्ट्र शासन**
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर यांचे कार्यालय**

दुसरा मजला, सिंचन भवन, नगर-औरंगाबाद रोड, अहमदनगर
दूरध्वनी क्रमांक - ०२४१-२३२३९१७ Email: minor.irrigation@gmail.com

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**जाहिरात क्र. ०१/ २०२२-२०२३**

## सेवानिवृत्त- "जलसंधारण अधिकारी" ( क.अ/शा.अ./सहा.अ.श्रेणी-२ ) यांच्या सेवा करार पद्धतीने विवक्षित कामासाठी घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दि.१७.१२.२०१६ अन्वये तसेच महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-३२ यांचे पत्र जा.क्र. आस्थाप-२०२०/प्र.क्र.२४७/जल-२ दि.०४/०७/२०२२ अन्वये प्राप्त दिशानिर्देशानुसार मा. अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे अधिनस्त असलेल्या नाशिक, पुणे व ठाणे, या तीन प्रादेशिक कार्यालयांतर्गत नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगांव, अहमदनगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या जिल्ह्याअंतर्गत कार्यक्षेत्रामध्ये जलसंधारण विभागातील खाली दिलेल्या विवक्षित कामाच्या तपशिलानुसार व खालील नमूद पदांकरिता उपरोक्त शासन निर्णयातील विहीत अटी व शर्तीचे अधीन राहून गट-ब करिता ११ महिनेसाठी सेवाकरार पद्धतीने थेट मुलाखतीद्वारे भरण्याकरिता जलसंधारण अधिकारी गट-ब ( राजपत्रित / अराजपत्रित ) या पदावर सेवेमधून सेवानिवृत्त झालेल्या सखोल अनुभव असलेल्या अभियंता यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. कंत्राटी पद्धतीवर भरावयाचा पदांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | संवर्ग | प्रादेशिक कार्यालय | विवक्षित कामाचा तपशील | आवश्यक अर्हता | पद संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | गट-ब जलसंधारण अधिकारी सहा. अभि. श्रेणी-२ /शा.अ./क.अ./ ( राजपत्रित/ अराजपत्रित ) | प्रादेशिक जलसंधारण अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, नाशिक | जलसंधारण विभागातील विविध योजनांचे सर्वेक्षण, अन्वेषण, संकल्पन, प्रशासकीय मान्यता, अंदाजपत्रके तांत्रिक मान्यता, सुप्रमा, निविदा प्रक्रिया, भूसंपादन प्रकल्प कार्यान्वित झालेल्या कामांची देयके, पाणी वापर संस्था स्थापना, सिंचन क्षेत्र मोजणी इ. साहाय्य करणे ही विवक्षित कामे | जलसंपदा व जलसंधारण विभागातून सेवानिवृत्त झालेले गट-ब जलसंधारण अधिकारी सहा.अभि.श्रेणी-२/शा.अ./क.अ. ( राजपत्रित/ अराजपत्रित ) | १५ |
| | | प्रादेशिक जलसंधारण अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पुणे | | | १५ |
| | | प्रादेशिक जलसंधारण अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, ठाणे | | | १० |
| | | | | **एकूण संख्या** | ४० |

### सदर नेमणुका ह्या खालील सर्वसाधारण शर्ती व अटींच्या अधिन राहतील.

१ ) करार पद्धतीवर नेमणुकीकरिता अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांचे वय दिनांक ०१/१२/२०२२ रोजी ६५वर्षेपेक्षा अधिक नसावे.
२ ) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यास ज्या पदासाठी अर्ज केला आहे, त्या पदाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.
३ ) सदर नियुक्ती एकावेळी जास्तीत जास्त ११ महिनेसाठी राहील किंवा अशा वाढीव कालावधीकरिता दरवर्षी सक्षम स्तरावर नूतनीकरण करणे बंधनकारक राहील व असा एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक राहणार नाही.
४ ) अर्ज करणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचाऱ्याविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी व न्यायालयीन प्रकरण नसावे याबाबत अर्जदारांनी ज्या कार्यालयातून सेवानिवृत्त झाले आहे, त्या संबंधित कार्यालयाकडून तसे प्रमाणपत्र घेऊन सादर करणे बंधनकारक राहील.
५ ) करार पद्धतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत किंवा सामावून घेण्याबाबत वा नियमित सेवेचा इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार नसेल याबाबत अर्जदाराने रु.१००/- च्या स्टॅम्पवर प्रतिज्ञालेख देण्यात यावा.
६ ) नियुक्त अर्जदाराला त्यांनी विहीत कार्यपालन केल्यामुळे महाराष्ट्र शासन, निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र. १००/१३, मंत्रालय, मुंबई दि.०८.०१.२०१६ मधील अटी व शर्तीप्रमाणे त्यांना सेवानिवृत्तीपूर्वी मिळत असलेल्या एकूण वेतनातून ( मूळ वेतन व महागाई भत्ता धरून ) त्यांना आता मिळत असलेले एकूण निवृत्ती वेतन, महागाई भत्ता आणि अंशराशीकृत निवृत्तीसह ) वजा केल्यानंतर होणारी रक्कम शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक म्हणून त्यांना अनुज्ञेय राहील.
७ ) करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीच्या वेळच्या वेतनास अनुसरून प्रवास भत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.
८ ) नियुक्ती प्राधिकारी ( अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे ) यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी करार पद्धतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.
९ ) करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराचे नेमून दिलेले काम समाधानकारक नसल्यास कोणतेही सबळ कारण न देता नियुक्त प्राधिकरी यांचे संमतीने त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल.
१० ) क्षेत्रिय स्तरावर करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास सेवाकाळामध्ये काही नैसर्गिक अपघात व काही आजार उद्भवल्यास कार्यालय / शासन बांधील राहणार नाही.
११ ) करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदारास नेमून दिलेली कामे पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील व तसे बंधपत्र/हमीपत्र त्यांच्याकडून घेण्यात येईल.
१२ ) अर्ज करतेवेळी सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांचे निवृत्तीवेतन मंजुरीचे महालेखापाल कार्यालयाचे आवश्यक दस्तऐवज सादर करावेत/डिसेंबर-२०२२ पर्यंत सेवानिवृत्त होणारे कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता/सहाय्यक अभियंता श्रेणी-२/उपविभागीय अभियंता/अधिकारी अर्ज करू शकतात तथापि त्यांचा अर्ज सेवानिवृत्तीनंतर विचारात घेण्यात येईल.
१३ ) करार पद्धतीने नियुक्त झालेल्या अर्जदाराने नियुक्तीच्या ठिकाणी नियुक्ती आदेश निर्गमित झालेल्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत रुजू होणे बंधनकारक राहील. अन्यथा सदर नियुक्ती आपोआप संपुष्ठात येईल.
१४ ) मुलाखतीकरिता पात्र उमेदवारांना पत्र ई-मेलद्वारे/टपालाने पाठविण्यात येईल व भ्रमणध्वनीवर लघुसंदेशाद्वारे कळविण्यात येईल. यास्तव अर्जदारांनी आपल्या वैयक्तिक माहिती, त्याचा ई-मेल पत्ता व भ्रमणध्वनी क्रमांक देणे बंधनकारक आहे. तसेच मुलाखतीसाठी पात्र उमेदवारांची यादी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक व जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर यांचे सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल व अंतिम निवड झालेल्या अर्जदारांची यादी वरील कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच अंतिम निवड झालेल्याअर्जदारांना वैयक्तिक ई-मेलद्वारे कळविण्यात येईल.

उपरोक्त प्रमाणे करारावरील नेमणुकीकरिता लागू असलेल्या अटी व शर्ती तसेच अर्जाचा नमुना प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, नाशिक, पुणे, ठाणे तसेच जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर यांचे कार्यालयात **दिनांक १७/११/२०२२ पासून २८/११/२०२२** पर्यंत उपलब्ध असतील. इच्छुक उमेदवारांनी विहीत नमुन्यातील अर्ज जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर, दुसरा मजला, सिंचन भवन, नगर-औरंगाबाद रोड, अहमदनगर दूरध्वनी क्रमांक-०२४१-२३२३९१७ यांचेकडे **दिनांक २८/११/२०२२ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** पोहचतील अशा बेताने पोष्टाद्वारे पंजीबद्ध डाकेने किंवा प्रत्यक्षरीत्या सादर करावा. तसेच अर्जाचे लिफाफ्यावर सेवानिवृत्त अधिकारी यांची करारावर गट-ब राजपत्रित / अराजपत्रित अभियंता या पदावर नेमणूक करण्याबाबत असे स्पष्ट लिहून अर्ज सादर करावा. नियोजित कालावधीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. सदर नेमणुका समितीच्या मुलाखतीद्वारे करण्यात येतील. उपरोक्त नेमणुकरिता आलेला कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज अस्वीकृत करण्याचे / रद्द करण्याचे, तसेच संपूर्ण नेमणूक प्रक्रिया किंवा करण्यात झालेली नेमणूक रद्द करण्याचे सर्व अधिकार हे नियुक्ती प्राधिकारी यांचेकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

**सही/-**

**जा.क्र./का.अ/४२१४**
**दिनांक ११/११/२०२२**

**सदस्य सचिव, निवड समिती तथा जिल्हा जलसंधारण अधिकारी,**
**मृद व जलसंधारण विभाग, अहमदनगर**

डीजीआयपीआर - २०२२-२३/४०४६

Email : minor.irrigation@gmail.com